**महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्र विकास प्राधिकरण**
Maharashtra Housing & Area Development Authority
**जनसंपर्क विभाग**
कक्ष क्र. १९/२०, तळ मजला, गृहनिर्माण भवन, कला नगर,
वांद्रे पूर्व, मुंबई - ४०००५१. दू. क्र. :- ०२२ ६६४०५०७७,
६६४०५०६६ ई मेल - cpromhada@gmail.com

==================================================================

जावक क्रमांक – ३२२५ दिनांक :- १७ ऑगस्ट, २०२२

प्रसिद्धीपत्रक

## म्हाडा मुख्यालयात सामूहिक राष्ट्रगीत गायन कार्यक्रम

मुंबई, दि. १७ ऑगस्ट, २०२२ :- भारतीय स्वातंत्र्याला ७५ वर्षे पूर्ण झाल्याचे औचित्य साधून स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव उपक्रम देशभर राबविला जात आहे. याच पार्श्वभूमीवर महाराष्ट्र शासनातर्फे राज्यात 'स्वराज्य महोत्सव' उपक्रम राबविला जात असून या उपक्रमांतर्गत महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्र विकास प्राधिकरणाच्या (म्हाडा) वांद्रे पूर्व येथील गृहनिर्माण भवन या म्हाडा मुख्यालयात आज सकाळी ११.०० वाजता सामूहिक राष्ट्रगीत गायन कार्यक्रम मोठ्या उत्साहात संपन्न झाला.

'म्हाडा'चे उपाध्यक्ष तथा मुख्य कार्यकारी अधिकारी श्री. अनिल डिग्गीकर, मुंबई इमारत दुरुस्ती व पुनर्रचना मंडळाचे मुख्य अधिकारी श्री. अरुण डोंगरे, म्हाडाचे मुख्य अभियंता-१ श्री. धीरजकुमार पंदिरकर, मुख्य अभियंता-२ श्री. सुनील जाधव, म्हाडाचे सचिव श्री. राजकुमार सागर, दक्षता व सुरक्षा अधिकारी श्री. संजय शिंदे आदी मान्यवरांसह म्हाडातील अधिकारी - कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

(सही /-)
मुख्य जनसंपर्क अधिकारी / प्राधिकरण


म्हाडा
MHADA
गृहनिर्माण भवनामधील छत्रपती
प्रतिमेचे अनावरण
माननीय श्री. बाळासाहेब ठाकरे
यांचे शुभहस्ते
माननीय नामदार श्री. मनोहर जोशी
माननीय नामदार श्री. गोपीनाथ मुंडे
यांचे प्रमुख उपस्थितीत
माननीय श्री. मधुकर सरपोतदार
यांचे अध्यक्षतेखाली
माननीय नामदार चंद्रकांत खैरे
माननीय नामदार राज पुरोहित
यांचे विशेष उपस्थितीत




Lift No. 1
FLOORS
3.4.5 ONLY